शासनसेवेत पुन:स्थापित करून पदस्थापना देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**क्रमांक:– R& FD-15071/14/2026- MRF(DESK E9)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०९ एप्रिल, २०२६

वाचा:- १. विभागीय आयुक्त, अमरावती यांचे आदेश क्र.विआकाअ/म.शा.५/विभाचौ/कावि-२१०/२०२५, दि.०२.०४.२०२५
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक निप्रआ-११२२/ प्र.क्र.०९/विचौ-२, दि.२२.०४.२०२५

**शासन आदेश-**

श्री.कौतिकराव विष्णाजी रावळकर, तत्का. निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मोताळा, जि.बुलढाणा यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७ अन्वये पोलीस स्टेशन बोराखेडी, जि.बुलढाणा येथे दि.१०.०३.२०२५ रोजी गु.र.क्र.१०३/२०२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यामध्ये श्री.रावळकर यांना अटक करण्यात आली आहे. त्यांचा पोलीस अभिरक्षेतील कालावधी ४८ तासांपेक्षा अधिक असल्याने व त्यांनी वरील प्रमाणे गंभीर स्वरुपाचे गैरकृत्य करुन शासकीय कामकाजात नितांत सचोटी व कर्तव्यपरायणता राखली नाही व जनमानसात शासनाची प्रतिमा मलीन केल्याने संदर्भीय आदेश क्र.१ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ (२) मधील तरतुदीनुसार श्री.रावळकर यांना दि.१०.०३.२०२५ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचनांनुसार श्री.कौतिकराव विष्णाजी रावळकर, तत्का. निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मोताळा, जि.बुलढाणा यांच्या निलंबनाचा कालावधी सुमारे १ वर्षापेक्षा जास्त झालेला असल्याने त्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने श्री.रावळकर यांच्या निलंबन प्रकरणाचा आढावा घेण्यात आला असून, श्री.रावळकर यांना अकार्यकारी पदावर शासनसेवेत पुन:स्थापित करण्याची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ (५) (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन श्री.कौतिकराव विष्णाजी रावळकर, तत्का. निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मोताळा, जि.बुलढाणा यांचे निलंबन संपुष्टात आणून त्यांना, त्यांच्याविरुध्दच्या विभागीय चौकशीच्या निर्णयाच्या अधिन राहून अकार्यकारी पदावर शासनसेवेत पुन:स्थापित करण्यात येत आहे.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचनांनुसार श्री.कौतिकराव विष्णाजी रावळकर, तत्का. निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मोताळा, जि.बुलढाणा यांना त्यांचा मूळ जिल्हा व ज्या जिल्ह्यात कार्यरत असताना निलंबित केले तो जिल्हा वगळून **नायब तहसीलदार (संगांयो), तहसिल कार्यालय बाळापूर, जि.अकोला** या पदावर पदस्थापना देण्यात येत आहे.

४. श्री.कौतीकराव रावळकर यांनी तात्काळ सदर पदावर रूजू व्हावे. संबंधित अधिकारी नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांनी desk९-rfd@mah.gov.in या ई-मेलद्वारे/टपालाद्वारे शासनास त्वरित कळवावे.

५. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयत्तेर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित केलेल्या उक्त तरतुदीनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापुर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुद्ध **शिस्तभंगविषयक कारवाई** करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास, त्यांच्या **अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन** (dies non) **म्हणून गणला जाईल**, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम - ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने सदर अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारू नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते सदर अधिकाऱ्याच्या मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

८. उपरोक्त आदेश सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमीत करण्यात येत असल्याने पदस्थापनेच्या ठिकाणी परिविक्षाधीन तहसीलदार वा अन्य अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांच्या स्तरावरुन तात्पुरते व्यवस्थेने पदस्थापना दिलेली असल्यास अशा अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांनी अन्य रिक्त पदावर पदस्थापना द्यावी.

९. सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून पदस्थापना रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ही गैरवर्तणूक समजून त्यांचे विरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०४०९१५३२१९०११९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.04.09 15:33:16 +05'30'

**(महेश वरुडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

श्री.कौतिकराव विष्णाजी रावळकर, तत्का. निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मोताळा, जि.बुलढाणा

(विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्यामार्फत)

**प्रत:-**

१) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
२) जिल्हाधिकारी, बुलढाणा/अकोला.
३) निवड नस्ती, आस्था- ९ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.